
ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# आव्हान

डॉ. प्रतीक्षा गायकवाड
मराठी विभागप्रमुख, पेमराज सारडा महाविदयालय,
अहमदनगर.




डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे हे लोकसाहित्याचे संशोधक म्हणून प्रसिध्द असून कथा, कादंब–या, कविता, नाटक, स्फूटलेखन इ. क्षेत्रांत त्यांच्या लेखणीने विहार केला आहे. त्यादृष्टीने त्यांच्या ''डांगाणी'' ''अहिनकुल'' , ''वावटळ'' , ''भेद'', ''मांतगी'', यांसारख्या कादंब–या उल्लेखनीय आहेत. अलीकडेच त्यांचे 'प्रिया' आणि 'कोहम' हे काव्यसंग्रह प्रसिध्द झाले असून 'लोकसाहित्यातील चकवे आणि उतारे' हा त्यांचा ग्रंथ विशेष गाजला.

डॉ. सहस्त्रबुध्दे यांचा 'आव्हान' हा एकच काव्यसंग्रह प्रकाशित झालेला असला, तरी त्यातून त्यांच्या चिंतनशील वृत्तीचे दर्शन घडत. त्यांची ही चिंतनशील कविता जीवनातील विविध प्रकारच्याप आव्हानांना कशा प्रकारे सामोरे जाते, हेच आव्हान मध्ये पाहवयास मिळते.जणूकाही आव्हान केले आहे असे वाटते : कारण मनापासून ते राजकारणापर्यंत सर्वच विषय त्यांच्या कवितांमध्ये आलेले आहेत.

आतापर्यंत दलितांना उपेक्षित जीवन जगावे लागले. केवळ दलित असल्यामुळे जनावंरासारखे जीवन आपल्याला व्यतित करावे लागत आहे. ही दलितांची व्यवथा, आक्रोश सर्वज्ञात आहे. परंतु ब्राह्मण समाजात जन्माला येऊन व्यथा मांडणारा ब्राह्मण प्रथमच पाहवयास मिळतो. त्यांच्या 'बामण' या कवितेत ते म्हणतात,

**होय! झालो बामण, काय करणार?**
**हातात का होते?**
**तर बरे झाले असते**
**सूर्यफूल म्हणून जन्मलो नसतो?**
**लाखोली निमूट ऐकणे**
**अपमानित लाजिरवाणे जगणे**
**महात्म्यांनीच मार्ग चोखाळला**
**तर काय करावे?**

ते ब्राम्हाण असूनदेखील त्यांचा दलितांसारखा छळ झाला? नाना त–हेच्या प्रसंगांना सामोरे जावे लागले? ही व्यथा मांडताना ते म्हणतात –

**'जानवी तोडा! .... तोडली !**
**वशाट खाता का ? वशाट ..... खाल्ले?**
**पोरी देता का?... गेल्या, नेल्या, दिल्या !**
**(करता का म्हणून नाही विचारलं)**
**मग हेटाळणीचा सूर आला**
**'ब्राम्हाण झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ...'**

मानवी संसारापासून कोणाचीही सुटका होऊ शकत नाही. परंतु डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या 'संसार' या काव्यातील संसार फक्त मानवापुरता मर्यादित नाही. तरी तो 'पावसाचा लोंढा', ' सजणीचा शृंगार', पाखराचं

घरटं', ' संसाराचा वेल' या स्वरुपाचा आहे. स्त्रीमुक्ती चळवळीमुळे आजची स्त्री स्वतंत्र आहे. ती व्यावसायिक क्षेत्रात उतरल्यामुळे तिचे तिच्या घराकडे पूर्णपणे दुर्लक्ष होते आहे. हीच खंत त्यांच्या 'संसार' या कवितेच्या अखेरीस त्यांनी पुढील काव्यपंक्तीतून व्यक्त केली आहे–

**स्त्रीमुक्तीच्या लढयानं**
**स्वातंत्र्य दिलं**
**घरपण हरवलं**

मानवी मनाचे चित्रण डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या ' मन मेघा रे मेघा रे ! ' मन हवे .....' या दोन कवितांमध्ये पाहवयास मिळते. बहिणाबाईंनी म्हटले आहे.

**मन पाखरु पाखरु**
**त्याची काय सांगू मात?**
**आता व्हतं भुईवर**
**गेलं गेलं आभाळात !**

त्याप्रमाणे डॉ. सहस्त्रबुध्दे यांना त्यांचे मन हे मेघासाखरे वाटते आहे. या मेघमय मनाची अवस्था त्यांनी पुढील शब्दांत व्यक्त केली आहे.

**मन मेघा रे मेघा रे तुझे आकार कोणते**
**कुठे सांडतो जीवन कुठे उगा अंधारते**
**नको नको मन मेघा असा होऊ सैरभैर**
**वीज वादळाने तुझ्या जनी उठते काहून**

'मन हवे....?' या त्यांच्या दुस–या काव्यात मानवी मन कसे असावे, याविषयी त्यांनी प्रतिपादन केले आहे. या कवितेत ते म्हणतात, 'मन हवे.... कापसासारखे, पाखरासारखे, वृक्षासारखे, पर्वतासारखे, गंगेसारखे, सागरासाखरे, आकाशासारखे,' या काव्याच्या अखेरीस विश्वाला प्रेरणादायी ठरणारे असे मन असावे, असे त्यांनी म्हटले आहे. हाच भाव त्यांच्या पुढील काव्यपंक्तीतून व्यक्त झाला आहे–

**मन हवे अनंताच्या स्मितासारखे**
**जडातील जडतेला चैतन्यमय चितविणारे**
**चरातील अस्तित्वाला चैतन्यरुप पाहणारे**
**अनंतातील चैतन्याला स्वरुपात पाहणारे**
**सुख–दुःखापलीकडील कैवल्याला स्पर्शणारे**
**विश्वप्रेरक, स्वयंप्रकाशी...**

जीवनातोल नानाविध संकटांमुळे वाटेला आलेले नैराश्य डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या 'ज्वालामुखी' या काव्यात पाहवयास मिळते. ऊन–पावसासारखी संकटे झेलत–झेलत माणूस हताश होतो आणि त्यावेळी या सगळयांचा अंत कधीच होणार नाही का? हे सगळं झुगारुन द्यावं, या सगळयावर मात करावी, विजय मिळवावा, असा विचार मानवाच्या मनात येतो. याच मानवाच्या व्यथेचे दर्शन डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या 'ज्वालामुखी' या काव्यात घडते. या काव्यात ते म्हणतात–

**माझे जीवन ज्वालामुखी !!!**
**उलथून टाकेल सारी**
**मारणारी जमात–नरकात!**
**भरडून– भरडून पेटवून गाडून टाकेल**
**कुरता, असूया, फसवेगिरी, ढोंगीपणा....**

या त्यांच्या काव्यातून त्यांच्या बंडखोर वृत्तीचे दर्शन घडते.

डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या 'आव्हान'मधीन काही कविता आपल्याला विचार करावयास भाग पाडतात.

उदा. 'खाज', 'हवी शांतता इथे कुणाला?', 'धक्का', 'कर्जटलेला', 'बामण', 'अस्मिता', 'जेव्हा मी डोळे मिटतो' इ.

राजकारणातील अंदाधुंदी, ढोंगीपणा यामुळे देशातील शांतता नष्ट झाली आहे. असे असले तरी काही ढोंगी राज्यकर्ते उगाचच राष्ट्रात, देशात शांतता टिकवून ठेवू अशी आश्वासने देतात. हाच भाव त्यांच्या हवी शांतता इथे कुणाला ? या त्यांच्या कवितेतून पुढील शब्दात व्यक्त झाला आहे –

**युनोमधून चर्चा करती**
**हवी शांतता जगतात**
**हवी मानवता विश्वबंधुता**
**शस्त्र हातामध्ये तरी सज्ज ।।१।।**

रुढी परंपरेने दलितांवर जे अन्याय–अत्याचार केले : त्यामुळेच दलित पेटून उठले. त्याकरिताच त्यांनी आक्रोश , विद्रोह केला. हाच आक्रोश डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या अस्मिता या काव्यात पाहवयास मिळतो. या कवितेत ते म्हणतात,

**आमुची किंमत आम्ही वाढवू**
**दलित न आम्ही आम्हास म्हणवू**
**बंधमुक्तता हवी आम्हाला**
**अंध बंद हे तोडू तरी ।।१।।**

याशिवाय ज्यांना आमचं स्वप्न आवडणार नाही, त्यांना आम्ही उलथून टाकू–असेही आव्हान त्यांच्या कवितेतील दलित करताना दिसतो.

**जीवनाचे रंग न्यारे**
**कधी बरसते आसू**
**कधी बहरते हासू**
**मिलन सुख–दुःखाचे**
**ऊन –पाऊस !**

यानुसार जीवनातील सुख–दुःखांचा आस्वाद घेताना मानवाला कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कर्ज हे घ्यावेच लागते. डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या ''कर्जटलेला '' या काव्यातील माणूस नानात–हेच्या कर्जामध्ये कसा बुडालेला आहे. तेच त्यांनी सांगितलेले आहे. ते असे–

**देवाचे, मातेचे, पित्याचे, ऋषींचे**
**माणसाचे, माणसातल्या, माणुसकीचे**
**चांगुलपणाचे, उदारतेचे, प्रेमाचे, सत्कार्याचे**
**ज्ञानाचे, मानाचे, दानाचे, पैशाचे**
**असे कितीतरी ....**

याबरोबरच ''कर्जटलेल्या '' मानवाच्या द्विधा मनःस्थितीचे चित्रण त्यांनी पुढील काव्यपंक्तींतून व्यक्त केले आहे.

**कर्जटलेल्या जीवनात कर्जटलेला मानव जगत असतो. जगत असतो ?**
**कुंथत असतो, कण्हत असतो, हुंदके देत असतो, विव्हळत असतो**
**कधी धूत्कारत कधी फिस्कारीतही असतो,**
**पण बहुधा रडत असतो**
**हट्ट करीत असतो....**

समाजातील ढोंगी, राक्षस, सैतान, अन्याय, अत्याचार, यांविरुध्द डॉ. सहस्त्रबुध्दे यांनी जसा आवाज उठवला आहे, त्याप्रमाणे राजकारण, त्यातील हेवे–दावे, अंदाधुंदी, भ्रष्टाचार, अविचार, खुर्चीसाई धडपड यांसारख्या गोष्टीवरही त्यांनी ताशेरे ओढले आहेत. म्हणूनच राजकारणाला त्यांनी त्यांच्या कवितेत ''खाज '' असे म्हटले आहे. या संदर्भात ते कवितेत म्हणतात,

**'राजकारण एक खाज'**
**उमटल नाही तरी दिसणारी**
**झपाटलेपण वाढत जाणारी**
**पडल्यावर वाढणारी**
**चढल्यावरही वाढणारी**
**आडाखे, आखाडे, अंदाज, आग, आकांक्षा**
**असंख्य फळ्यातून फोफावणारी ....**

सारांश, जीवनाकडे, जगाकडे पाहण्याची सूक्ष्म दृष्टी, दलितांबद्दल, मानवतेबद्दल आर्त तळमळ, स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुता या त्रिसुत्रींबद्दल प्रेम, आदर, अभिमान, विश्वाच्या कल्याणार्थ प्रयत्न, अन्यायाला प्रतिकार करण्याची बंडखोर वृत्ती डॉ. सहस्त्रबुध्दे यांच्या या सर्व गुणांचे दर्शन त्यांच्या 'आव्हान' या काव्यसंग्रहातून झाल्यावाचून राहत नाही.